# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १३/०६/२०१८

### मालेगाव तालुक्यातील मेहुणे गावचे शिवारात दरोडा टाकणारे गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने औरंगाबाद जिल्हयातुन केले जेरबंद

---

दिनांक २९/०५/२०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास गंगापुर ता.औरंगाबाद येथील ट्रक चालक कल्याण बडोगे हे त्यांचे ताब्यातील मालट्रक क्र.एम.एच.१६.ए.ई.१८५२ हिचेत तांदुळ घेवुन मालेगाव येथे खाली करणेसाठी नांदगाव ते मालेगाव रोडवर जात असतांना, मेहुणे गावचे शिवारात अज्ञात ०४ ते ०५ आरोपीतांनी त्यांचेकडील अल्फा कंपनीची रिक्षा ट्रकला आडवी लावुन ट्रकचे कॅबिनमध्ये चढुन ड्रायव्हर व क्लिनरला चाकुचा धाक दाखवुन, मारहाण करून रोख रूपये व मोबाईल फोन असा एकुण १९,७०० रू. चा मुद्देमाल जबरीने दरोडा टाकुन नेला होता. सदर बाबत मालेगाव तालुका पोलीस ठाणेस I गुरनं १४०/२०१८ भादवि कलम ३९५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक जिल्हयातील महामार्गांवरील गुन्हे उघडकीस आणणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व **अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. हर्ष पोद्दार सो** यांनी पोलीस ठाण्यांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास सतर्क रात्रगस्त घालणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना सदर गुन्हयात वापरलेली रिक्षा व अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेसाठी मार्गदर्शन करून गुन्हा उघडकीस आणणेसाठी सुचना दिल्या.

दरम्यान सदर गुन्हयाचे समांतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी नांदगाव, मनमाड तसेच जिल्हयाचे सिमावर्ती भागात सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे, सदर गुन्हा करणारे आरोपी व गुन्हयात वापरलेली रिक्षा ही औरंगाबाद जिल्हयातील असलेबाबत खात्रीशीर समजले. त्यानुसार दिनांक १२ जुन २०१८ रोजी स्थागुशाचे पथकाने औरंगाबाद शहरात धाव घेवुन तपासाची चक्रे फिरविली, औरंगाबाद शहरातील नारेगाव परिसरात रात्रभर सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) कलीम शब्बीर शहा,** वय २१, रा. नारेगाव, ता.जि.औरंगाबाद, व **२) शेख अरबाज शेख नब्बु,** वय २०, रा. सहारा पॉईंट, औरंगाबाद यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी त्यांचे साथीदार नामे ३) शेख अरबाज शेख इद्रीस, ४) फारूख शहा शब्बीर शहा, दोन्ही रा. औरंगाबाद यांचे मदतीने सुमारे १० दिवसांपुर्वी मालेगाव ते नांदगाव रोडवर एक ट्रक ड्रायव्हरला हा रस्ता कोठे जातो असे विचारण्याचा बहाणा करून त्याची ट्रक अडवुन ड्रायव्हर व क्लीनरला मारहाण करून त्यांचेकडील रोख रक्कम व मोबाईल फोन जबरीने लुटमार केल्याची कबुली दिली आहे.

सदर गुन्हयातील ताब्यात घेतलेला आरोपी नामे कलीम शहा याचे कब्जातुन **गुन्हयात वापरलेली अल्फा कंपनीची रिक्षा क्र. एम.एच.२०.बी.टी.९३४२ ही जप्त करण्यात** आली असुन सदर आरोपीचा साथीदार नामे शेख अरबाज शेख इद्रीस (विधीसंघर्षित) यास औरंगाबाद शहरातील बेरीबाग परिसरातुन ताब्यात घेतले, त्याचे अंगडझडतीत **गुन्हयात चोरीस केलेला कार्बन कंपनीचा मोबाईल** फोन मिळुन आला आहे. सदर आरोपीतांचे कब्जातुन गुन्हयात वापरलेली वरील अल्फा रिक्षा, मोबाईल फोन व रोख रक्कम असा **एकुण १,३०,२००/- रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील वरील सर्व आरोपी हे औरंगाबाद शहरातील रहिवासी असुन ते दिनांक २९ मे २०१८ रोजी त्यांचे मालेगाव येथील नातेवांईकांकडे आलेले होते, दरम्यान औरंगाबाद येथे परत जातांना त्यांनी मालेगाव ते नांदगाव रोडवर मेहुणे गावचे शिवारात मध्यरात्रीचे सुमारास एक मालट्रक अडवुन चालक व क्लिनरला मारहाण करून लुटमार केली असल्याची कबुली दिली आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकातील सहा.पोलीस निरीक्षक आशिष अडसुळ, सहा.पोलीस निरीक्षक संदिप दुनगहू, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल नाईक, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा वसंत महाले, दिपक आहिरे, राजु मोरे, सुहास छत्रे, पुंडलीक राउत, पोना राकेश उबाळे, अमोल घुगे, पोकॉ रलिलाल वाघ, फिरोज पठाण, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, राजु वायकंडे अशा पथकाने सदर गुन्हयातील आरोपीतांना औरंगाबाद येथुन ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.